Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.III/April; 12pp.1-4

ISSN:-2230-7850

Research Papers

# 'शिक्षक व त्याचे व्यावसायिक उत्तरदायित्व'

डॉ.राऊत ए.आर.
संशोधक विद्यार्थिनी

**प्रस्तावना :–**

शिक्षकी व्यवसाय हा एक पवित्र आणि आत्मिक समाधान देणारा, सेवाव्रत्ती पेशा आहे तो पैसा कमविण्याचा व्यवसाय नसून त्यातून गरजेपूरता पैसा उपलब्ध झाला म्हणजे, एवढीच मात्र अपेक्षा असली पाहिजे, कारण शिक्षक हा विद्यादानाचा उत्प्रेरक म्हणून त्याने ज्ञानदान करून समाजाचा उत्कर्श साधावा ही भारतीय संस्कृतीची परंपरा ! त्यामुळे भारतीय संस्कृतीने शिक्षकांना 'गुरू' किंवा 'आचार्य' ही पदवी बहाल केली. परंतु कालओघात शिक्षणाचे स्वरूप बदलले. लोकसंख्या वाढीचा प्रस्फोट झाला. त्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता खालावली आणि शिक्षकाला त्यासाठी जबाबदार धरले जाउ लागले. म्हणून शिक्षकांचे मुल्यमापन व्हावे ही कल्पना प्रथम अमेरिकेत मांडण्यात आली आणि शिक्षकांच्या मूल्यमापनासाठी किंवा त्यांचा प्रभाविपणा/परिणामकारकता ठरविण्यासाठी शिक्षकाचे उत्तरदायित्व, व्यवसायिक, जबाबदा–या प्रमाणिकपणा याबबत विचार सुरू झाला.

***उत्तरदायित्व/जबाबदारी :***

एखाद्या व्यक्तीने शिक्षकी व्यवसायात पदार्पण केल्यानंतर तिच्यावर काही जबाबदा–या सोडविल्या जातात. आपण व्यवसायाच्या स्वरूपानुसार अध्यापकांला या जबाबदा–या पार पाडाव्या लागतात आणि दोन वर्षाच्या परिक्षाकाळातील त्यांच्या कार्याचे मूल्यमापन केले जाते. किंवा वर्षाच्या शेवटी अध्यापकाच्या कार्याचे मूल्यमापन वरिष्ठांकडून केले जाते. त्या आधारावर त्याची परिणामकारकता ठरविली जाते.

लेमनच्या मते :

'एखाद्या व्यक्तीला सोपविलेली जबाबदारी तिने किती प्रभावीपणे किंवा कशाप्रकारे पार पाडली याचे मूल्यमापन करणे म्हणजे उत्तरदायित्व होय'

Accountability means as accounting of one's performance with respect to the responsibility given to an individual – Lamyan.

म्हणजेच उत्तरदायित्व हे दुसरे–तिसरे काही नसून एखाद्या व्यक्तीने तिला सोपवलेली जबाबदारी कशाप्रकारे पार पाडली हे मापन करणे होय.

According to Webster's Encyclopedia Dictionary
"Accountability means on's subject to having to report explain or justify and he is responsible and answer able to somebody else"

***उत्तरदायित्वाची वैशिष्टये :***

***1. उत्तरदायित्व हे बहुआयामी :***
डनसपिकपउमदेपवदे संकल्पना असून व्यक्तीचे कार्ययात निर्माण होणा–या समस्या तिला मिळणारे प्रोत्साहन यांचा विचार केला जातो.

2. उत्तरदायित्व ही ध्येयोन्मुख कृती आहे.
3. उत्तरदायित्व निकशावर आधारित असते.
4. उत्तरदायित्व ही वरिश्ठाला उत्तर देणारी प्रकिया आहे.
5. उत्तरदायित्व ही गतीमान प्रक्रिया आहे.
6. मूल्यमापन हे उत्तरदायित्वाचे अविभाज्य भाग आहे.

उत्तरदायित्वासाठी आवश्यक असणा–या व्यावसायिक क्षमता :

1. वैयक्तिक अनुदेश
2. बालकांचे अध्ययनार्थ्यांचे निरिक्षण
3. अध्ययन स्त्रोत व प्रसंगाचे आयोजन करणे
4. अभ्यासक्रम अध्यनार्थ्यापर्यंत पोहचविण्यासाठी प्रभावी पध्दती निवड
5. विशेष गरजा असणा–या विद्यार्थ्यांची काळजी घेणे त्यांच्या अध्ययनविशयक समस्या सोडविणे
6. अध्ययनार्थ्यांना समस्या निराकरणामध्ये निपूण बनविणे
7. अध्ययन निश्पत्तीचे मूल्यमापन करणे
8. विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही नागरिकत्वाचे गुण रूजवणे
9. विविध कार्यकमाचे आयोजन करून विद्यार्थ्यांना सहभागी होण्याची संधी देणे.
10. सामाजिक विकासाचे कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी करणे, त्या कार्यकमात प्रत्यक्षा सहभागी होणे.

**Please cite this Article as :** *डॉ.राऊत ए.आर*, *'शिक्षक व त्याचे व्यावसायिक उत्तरदायित्व'* : **Indian Streams Research Journal (April ; 2012)**

या व्यावसायिक क्षमता अध्यापकाच्या उत्तरदायित्वाचे मापन करण्यासाठी साहायक ठरतात. व्यावसायिक क्षमता असणारा अध्यापक ।बबवनदजंइपसपजल ला लक्ष देणारा असतो.

***उत्तरदायित्वाचे उद्देश :***

(Objectives of Accountability)

1. व्यक्तीचे कार्य यशस्वितेचे मापन करणे
2. व्यक्तीच्या व्यवसाय समाधानाचे मापन करणे
3. व्यक्तीने पार पाडलेल्या कार्याचे वेळ श्रम व दर्जा या संदर्भांत मापन करणे.
4. कार्यामध्ये गुणात्मक सुधारणा करण्यासाठी उपाययोजनांचा अवलंब करणे
5. व्यक्तीचा स्वविकास व व्यावसायिक विकास होण्यासाठी मदत करणे

असे विविध उद्देश असल्यामुळे अध्यापकाला आपले कार्य यशस्वीरित्या पार पाडता यावे याकरीता उत्तरदायित्व मदत करते. उत्तरदायित्व ही वरिष्ठांनी सोपविलेली जबाबदारी असल्यामुळे ती टाळता येत नाही. उत्तरदायित्व शिक्षणाची आणि अध्यापकाची गुणवत्ता ठरविणारा निदर्शक असल्यामुळे शिक्षण संस्थांनी त्यासाठी निश्चित मापक तयार करून आपल्या संस्थेतील अध्यापकाचे मूल्यमापन करावे.

***संदर्भसूची :***

1. शिक्षकांच्या गुणवत्ता वाढीमध्ये जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेची भूमिका एक चिकित्सक अभ्यास – डॉ.साखरे एस.एस. (पीएच.डी संशोधन प्रबंध)

2. शिक्षक–शिक्षण – प्रा.बन्सी बिहारी पंडीत, प्रा.डॉ.सौ नलिनी पाटील., प्रा.डॉ.सौ.लता सुभाश मोरे.

3- Dictionary and Handbook and Teacher Education – R.S.Reddy.

4- Encyclopedia and Education – B.N.Das., Pal Monrao (Editoary)

**Please cite this Article as :** *डॉ.राऊत ए.आर*, *'शिक्षक व त्याचे व्यावसायिक उत्तरदायित्व'* **: Indian Streams Research Journal (April ; 2012)**